**नियमित दिवाणी दावा क्र.९८/२०१९**
**निशाणी क्र. ३१**

**वादीतर्फे सा.क्र.१ यांची साक्ष**
**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** **:-** विक्रम रमेश मोरे
**वय** **:-** **४३** वर्षे **कामधंदा** **:-** शेती
**रा.** **:-** पिंपळगाव बसवंत, नाशिक

आज रोजी वादी यांनी न्यायालयात हजर असून नि.क्र.३१ वरील त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्याचे, तसेच ते मान्य व कबूल केलेले आहे. त्यांनी शपथेवर त्यांच्या सरतपासातच्या प्रतिज्ञापत्रातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे मान्य केले आहे. त्यावर त्यांची सही असल्याचे मान्य केले आहे. सबब, सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील मजकूर वाचला व नोंदविला.

**शपथेवर सरतपास वादीतर्फे वकील श्री.आर.टी.चव्हाण यांचेमार्फत**

मी दाव्यासोबत नि.क्र.०३ दस्तऐवज यादी दाखल केलेली आहे. त्यात पिंपळगाव बसवंत येथील सर्वे नं.७६९/१ चा दि.११.११.२०१९ व दि.१०.०२.२०१७ रोजीच्या ७/१२ उता-याच्या प्रमाणित प्रती दाखल केलेल्या आहे. सबब, त्यास **निशाणी क्र.३२ व ३३** देण्यात येतो. तसेच प्रतिवादी क्र.२ विरूध्द दिलेली फिर्याद

सरतपास संपला.

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.महेश पवार यांच्या विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

दिनांक : ११/१२/२०२५
ठिकाण : पिंपळगाव (ब)

(व्ही.डब्ल्यू. खेंदाड)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पिंपळगाव (ब) ता.निफाड, जि. नाशिक

**नियमित दिवाणी दावा क्र.९८/२०१९**
**निशाणी क्र. ३१ पुढे**

**<u>उलटतपास शपथेवर प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.महेश पवार यांच्या मार्फत</u>**

**३.** हे म्हणणे खरे आहे की, गट नं.७६९/१ चे एकूण क्षेत्र ५ हे.७१ आर इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यापैकी माझे १ हे ७६ आर इतके क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मिळकतीच्या पूर्व दिशेला प्रतिवादी यांचे क्षेत्र, दक्षिणेला श्यामराव विनायक मोरे, पश्चिमेला चारी व रस्ता व उत्तरेला आहेरगाव रोड आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी मिळकत आहेरगाव रोडपर्यंत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आहेरगाव रोड लगतच्या माझ्या क्षेत्राला तारेचे कुंपण केलेले आहे.

**४.** हे म्हणणे खरे आहे की, मी केलेल्या तार कुंपणाच्या उत्तरेला आहेरगाव रोड आहे. हे म्हणणे खरे आहे की, आहेरगाव रोडच्या उत्तरेला दक्षिणोत्तर नाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो नाला प्रतिवादीच्या उत्तर पूर्व कोप-यात येवून पुढे प्रतिवादीच्या मिळकतीच्या पूर्वेकडून पश्चिमेकडे जातो. हे म्हणणे खरे आहे की, माझी मिळकत व नाला या दरम्यान प्रतिवादीचे क्षेत्र आहे.

**५.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मिळकतीच्या उत्तरेला किंवा पूर्वेला नाला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे नाल्याचे पाणी माझ्या मिळकतीच्या क्षेत्रात येण्याचे काही कारण नाही. हे म्हणणे खरे नाही की, पावसाचे पाणी माझे क्षेत्रात येत नाही म्हणून माझ्या मिळकतीची धूप होत नाही. पावसाच्या पाण्यामुळे माझ्या मिळकतीची धूप होते याबाबत सरकारी कार्यालयात केलेल्या तक्रारीची प्रत मी न्यायालयात दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, तशी कोणतीही प्रत माझ्याकडे नसल्यामुळे मी दाखल केलेली नाही.

**६.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मिळकतीच्या पूर्व बांधावर असलेली झाडे केव्हा लावली याबाबत वादपत्र व प्रतिज्ञापत्रात नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, ती झाडी मी स्वत:हून लावलेली नाही म्हणून त्याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या झाडासंबंधीची बिले किंवा फोटो मी दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, तशी बिले किंवा झाडे असल्याचे फोटो माझ्याकडे नाही म्हणून मी दाखल केलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, प्रत्यक्षात तशी कोणतीही झाडे नाही म्हणून मी त्याबाबतचे फोटो दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पूर्व बांधावर मी कोणत्याही झाडांची लागवड केलेली नाही.

**७.** हे म्हणणे खरे आहे की, गट नं.७६९/१ मध्ये माझ्यासोबत प्रतिवादी श्यामराव मोरे, भिमराव मोरे असे इतर शेतकरी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, गटाची मोजणी होवून त्याचे बांध पडलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे फाळणी होवून ७/१२ स्वतंत्र झालेले नाही. त्याबाबतचा मोजणी नकाशा मी न्यायालयात दाखल केलेला नाही. तसा नकाशा मी आजपर्यंत भूमी अभिलेखकडून मिळवलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, तो नकाशा मी आजपर्यत पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, भूमि अभिलेखने आजपर्यंत बांध निश्चीत केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत झाडे माझ्या क्षेत्राच्या बांधावर असल्याबाबत मी मोजणी केलेली नाही. भूमि अभिलेख मोजणीचा नंबर मला सांगता येणार नाही. ती मोजणी कोणी व कधी केली हे आता मला आठवत नाही. मी तो नकाशा भूमि अभिलेखमधून काढून न्यायालयात दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या मोजणी नकाशात तथाकथीत झाडे माझ्या क्षेत्राच्या बांधावर असल्याचे नमूद नाही त्यामुळे मी तो नकाशा आजपर्यंत दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत झाडे माझ्या क्षेत्रात असल्याचे दाखवणारा कोणताही नकाशा मी न्यायालयात दाखल

केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही झाडे पूर्व बांधावर नसल्यामुळे मी त्याबाबतचा नकाशा दाखल केलेला नाही.

**८.** हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत झाडांची नोंद घेतेवेळी लगतच्या कब्जेधारकांना तशी नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे नाही की, तशी नोंद घेतेवेळी त्याबाबतची माहिती प्रतिवादी व इतर लगत कब्जेधारकांना नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत झाडांची नोंद प्रतिवादीला अंधारात ठेवून घेतली. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत झाडे पूर्व बांधावर असल्याचे ७/१२ उता-यावर नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, तशी कोणतीही झाडे पूर्व बांधावर नसल्याने त्याबाबतची तशी नोंद ७/१२ उता-यावर नाही.

**९.** हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी यांनी माझ्या पूर्व बांधालगत त्यांच्या क्षेत्रात पॅकीग शेड उभारलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, पॅकीग शेड व माझा पूर्व बांध या दरम्यान काही अंतर सोडलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सोडलेल्या जागेत नैसर्गिकरित्या झाडे वाढलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मिळकतीच्या उत्तर दिशेला मी काही झाडे लावलेली आहेत.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, मी गट नं.७६९/१ मधील माझ्या मिळकतीत राहतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी त्यांच्या मिळकतीपासून ०२ कि.मी. अंतरावर राहतात. हे म्हणणे खरे आहे की, ते जावून येवून शेती करतात. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी त्यांच्या क्षेत्रात केळीची बाग लावलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी हे प्रगतशील शेतकरी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज माझ्या क्षेत्रात द्राक्ष बाग नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी तेथे राहत नसल्याचा गैरफायदा घेवून मी त्याच्या क्षेत्रात अतिक्रमणाचा प्रयत्न केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याला प्रतिवादीने विरोध केल्यामुळे मी खोटा दावा दाखल केला आहे.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, आहेरगाव रस्ता हा डांबरी व वाहतूकीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी राहतो त्याच्या आजूबाजूला इतर शेतकरी राहतात. हे म्हणणे खरे आहे की, ०१.११.२०१९ च्या घटनेबाबत स्वतंत्र साक्षीदार असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, तशी कोणतीही घटना घडली नाही म्हणून त्याबाबत स्वतंत्र साक्षीदार दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.०१.११.२०१९ रोजीच्या घटनेबाबत दिलेली तक्रार न्यायालयाने माझ्या गैरहजेरीमुळे कामकाजातून काढून टाकली. हे म्हणणे खरे नाही की, ती घटना खोटी होती म्हणून त्याबाबतच्या तक्रारीचा पाठपुरावा मी केला नाही.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडील क्षेत्राचा पूर्व बांध काढून घेतलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रत्यक्षात पूर्व बांधावरील माझ्या क्षेत्रात कोणतीही झाडे अस्तित्वात नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र.३ ते ७ मधील मजकूर खोटा नमूद केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, परिच्छेद क्र.८ मधील विनंती खोटी नमूद केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीला त्रास देण्याच्या उद्देशाने खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, अशा वेगवेगळया खोटया कम्लेन्ट दाखल करून प्रतिवादी यांना त्रास देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा दावा, सरतपास, कागदपत्रे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

दिनांक : १५/०४/२०२६
ठिकाण : पिंपळगाव (ब)

(व्ही.डब्ल्यू. खेंदाड)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पिंपळगाव (ब) ता.निफाड, जि. नाशिक